ISSN 2249-894X Impact Factor : 3.1402 (UIF) Volume - 5 | Issue - 3 | Dec - 2015

Review Of Research

# नागपूर जिल्हयातील संत्रा उत्पादकांच्या सामाजिक व आर्थिक स्थितीचे विश्लेषणात्मक अध्ययन

डॉ. गजानन गोपालराव बाबडे
नुतन आदर्श कला, वाणिज्य व म. ह. वेगळ विज्ञान महाविद्यालय, उमरेड

**सारांश**

प्रस्तुत संशोधन हे नागपूर जिल्हयातील संत्रा उत्पादकांच्या सामाजिक व आर्थिक स्थितीशी निगडीत आहे भारत हा कृषीप्रधान देश आहे. जास्तीत जास्त लोकांचे जीवन शेती व्यवसायाशी निगडीत आहे. भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा हा शेती उत्पादनाशी संबंधीत आहे. त्यामुळे हवामानानुसार शेतीत अन्नधान्याचे उत्पादन, उत्पादीत मालाचे वितरण शेतकऱ्यांना मिळणारे उत्पादन मुल्य याचा अभ्यास करणे आवश्यक आहे. शेतकऱ्यांच्या परिश्रमावरच विशेषत: शेतमालाचे उत्पादन अवलंबून असल्यामुळें शेतकऱ्यांचे जीवनमान त्यांचे सामाजिक प्रश्न, त्यांची आर्थिक समस्या तसेच शेतमालाचे विपणन करतांना येणाऱ्या अडचणी या व्यतिरिक्त शेतकऱ्यासमोर अनेक प्रश्न निर्माण होत असतात. त्या समस्यांचे सहानुभूतीपूर्वक विचार करुन शासनाने उचीत सहकार्य देण्याची भुमिका पार पाडली तर नागपूर जिल्हयातील संत्रा उत्पादकांना त्याचा निश्चितच फायदा होऊ शकतो.



**प्रस्तावना :-**

आपल्या देशात घेतल्या जाणाऱ्या विविध फळझाडांमध्ये संत्रा हे अतिशय महत्वाचे व शेतकऱ्यांना आर्थिक स्थैर्य देणारे फळपिक आहे. संत्रा फळबागांमध्ये रोजगार क्षमता असल्यामुळे उत्तर, पूर्व, मध्य, दक्षिण व पश्चिम भारतातील जनतेचे उपजीविकेचे साधन म्हणून या फळपीकांकडे पाहिले जाते. विदर्भ, मराठवाडा आणि शेजारच्या मध्य प्रदेश व राजस्थानात नागपूर संत्रा हे एक महत्वाचे व चांगले उत्पन्न देणारे पीक आहे. पाण्याचा निचरा होईल अशी जमीन व पिकाला आवश्यक तेवढे पाणी याची सोय केल्यास संत्र्याची फायदेशीर शेती करता येते. बागेतील कामे वेळोवेळी तंत्रशुद्ध पध्दतीने करून बरेच संत्रा बागायतदार सातत्याने एकरी चांगल्यापैकी नफा मिळवित आहेत.

"शेती हे केवळ आर्थिक उत्पादनाचे साधन नसून सांस्कृतिक विकासाचे माध्यम आहे" "शेतकरी हा असा व्यक्ती आहे जो स्वत: व्यापारी यंत्र व मजूर देखील आहे." कारण आज कसेल त्याची शेती आहे, म्हणून तो स्वत: जोपर्यंत शेतीत राबत नाही, लक्ष देत नाही तोपर्यंत उत्पादन वाढणार नाही, तसेच शेती ही शेतकरी व निसर्ग यांच्यातील भागीदारी होय. कारण शेतीमध्ये येणारे पीक पूर्णत: निसर्गावर अवलंबून असते

**इतिहास :-**

संत्र्याचा जन्म दक्षिणपूर्व आशिया खंडात झाला. ज्या भागात एखाद्या झाडाच्या जास्तीत जास्त जंगली जाती आढळतात. तो भाग त्या त्या झाडाचे उगम स्थान आहे असे मानतात. दक्षिणपूर्व आशियामध्ये भारताचा संपुर्ण उत्तर भाग ब्रम्हदेश, चीन, देशाचा दक्षिण भाग मलेशिया, थायलंड, इंडोनेशिया इत्यादि देश येतात. चीन देशात संत्र्याची लागवड ४५०० वर्षापुर्वी प्रचलीत होती. असे संदर्भ सापडतात. संत्र्याचा जगभर प्रसार फार तर ५०० वर्षापुर्वी झाला असावा. या काळात जगामध्ये जहाजाचे दळण वळण झपाट्याने वाढले व तितक्याच झपाट्याने एक गोड फळ म्हणुन मान्यता मिळाली. संत्र्यामध्ये ॲस्कॉबीक ॲसीड नावाचे द्रव्य (व्हिटॅमिन-सी) असते ॲस्कॉबीक ॲसीड कमी पडल्यास स्कर्व्ही नावाचा रोग होतो. या रोगामुळे हाड ठिसुळ होतात, दातातुन रक्त येते जखमा लवकर भरत नाही. संत्रावर्गीय फळाचा नियमित वापर केल्यास या रोगाला आळा घालता येतो.

**हवामान :-**

समुद्रसपाटी पासुन ३७० - १५०० मी. उंचीवर वसलेल्या प्रदेषात संत्रा लागवड करता येते. संत्र्याच्या झाडांची वाढ १० ते ३५ सें. ग्रे. या तापमानात उत्तम होते. संत्र्याच्या चांगल्या उत्पादनासाठी उष्ण व दमट हवामान उपयुक्त असते. या पिकास ६२०ते १२०० मि. मी. वार्षिक पाऊसमान आणि ५० ते ५३ प्रतिशत हवेतील आर्द्रता चांगली मानवते.

**जमीनीची निवड :-**

या पिकासाठी मध्यम काळी १ते १.५ मीटर खोलीची, पाण्याचा उत्तम निचरा होणारी, माती मिश्रीत मुरुम अथवा वाळूमिश्रीत मातीचा थर असलेली व ज्या जमिनीचा आम्ल- विम्ल निर्द्रेशांक ५. ५ते ७.५ च्या दरम्यान आहे. अशी जमिन निवडावी.

**उद्दिष्टये :-**

१. नविन तंत्रज्ञानाची माहिती शेतकऱ्यांना योग्य वेळी न मिळणे यांची कारणे शोधणे हृ
२. शेतकऱ्यांना शासकिय योजना माहित नसणे यावर उपाययोजना सूचविणे.
३. संत्रा विक्रीबाबत असलेल्या समस्या शोधुन काढणे.

**पद्धतीशास्त्र :-** संत्रा उत्पादकांच्या आर्थिक स्थितीचे अध्ययन विश्लेषणात्मक तसेच सर्वेक्षणात्मक पद्धतीचा समन्वय साधुन करण्यात आले. तथ्यसंकलनाकरिता नागपूर जिल्हयातील संत्रा उत्पादकांच्या सामाजिक व आर्थिक समस्यांचा अभ्यास करण्यात आला जेणेकरुन एकंदरित समाजव्यवस्थेचे संख्यात्मक आकलन करता आले.

**शोधक्षेत्र :-** संत्रा उत्पादकांच्या आर्थिक स्थितीचा प्रभाव नागपूर शहरावर पडल्याचे आढळते. म्हणून प्रस्तुत अध्ययनासाठी नागपूर येथील १०० संत्रा उत्पादक कुटुंबाचा अभ्यास करण्यात आला.

**नमुना निवड :-** प्रस्तुत अध्ययनासाठी नागपूर शहरातील सर्वभागातील शेतीवर्ग स्तरातील १०० संत्रा उत्पादक कुटुंबाचे अध्ययन करण्यात आले.

**तथ्यसंकलन :-** अध्ययनासाठी प्राथमिक स्त्रोत, दुय्यम स्त्रोत, निरिक्षण, मुलाखत, अनुसुची यांच्या आधारे माहीती संकलीत करण्यात आली.

**वार्षिक उत्पन्न :-**

१०० शेतकऱ्यांच्या करण्यात आलेल्या सर्वेक्षणावरूण नागपूर क्षेत्रात मध्यमवर्गीय शेतकऱ्यांचे प्रमाण अधिक असल्याचे दिसून येते, तर साधारण शेतकऱ्यांचे प्रमाण कमी आहे.

**सारणी क्र -१ संत्रा बागायतदारांचा वयोगट दर्शक सारणी**

| अ क्र | विवरण वयोगट (वर्ष) | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | १५ ते २५ | १० | १०.०० |
| २ | २५ ते ३५ | ३० | ३०.०० |
| ३ | ३५ ते ४५ | ४० | ४०.०० |
| ४ | ४५ ते ६० | १० | १०.०० |
| ५ | ६० च्या वर | १० | १०.०० |
| | एकूण | १०० | १००.०० |

वरिल

सारणीवरुन असे दिसुन येते की, १०० उत्तरदात्यांपैकी १० टक्के उत्तदाते १५ ते २५ वर्ष वयोगटातील आहेत. तर २५ ते ३५ वर्ष वयोगटातील३० टक्के उत्तरदाते आहेत व ३५ ते ४५ वर्ष वयोगटातील ४० टक्के उत्तरदाते आहेत. तर ४५ ते ६० वर्ष वयोगटातील १० टक्के उत्तदाते आहेत तर १० टक्के ६० वर्षाच्या वर वयोगटातील आहेत. अर्थात अधिक उत्तरदाते हे उत्पादक गटात असल्याचे दिसून येते.

### सारणी क्र -२ भूधारण क्षेत्राचे प्रमाण दर्शविणारी सारणी

| अ.क्र | विवरण भूधारण क्षेत्राची मर्यादा | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | १ ते ५एकर | ३० | ३०.०० |
| २ | ५ ते १० एकर | ३६ | ३६.०० |
| ३ | १० ते १५ एकर | २४ | २४.०० |
| ४ | १५ ते २० एकर | ०५ | ०५.०० |
| ५ | २० एकरच्या वर | ०५ | ०५.०० |
| | एकूण | १०० | १००.०० |

वरिल सारणीवरुन असे दिसुन येते की, नागपूर क्षेत्रात १ ते ५ एकर भूधारण क्षेत्र असणारे ३०. ०० टक्के उत्तरदाते आहेत व ५ ते १० एकर भूधारण क्षेत्र असणारे ३६.०० टक्के उत्तरदाते आहेत, १० ते १५ एकर भूधारण क्षेत्र असणारे २४.०० टक्के उत्तरदाते आहेत व १५ ते २० एकर भूधारण क्षेत्र असणारे ०५.०० टक्के उत्तरदाते आहेत, २० एकरच्या वर भूधारण क्षेत्र असणारे ०५.०० टक्के उत्तरदाते आहेत.

### सारणी क्र -३ शेतकऱ्यांचे वार्षिक उत्पन्न दर्शविणारी सारणी

| अ.क्र | विवरण वार्षिक उत्पन्न (रूपयांमध्ये) | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | १ ते १० हजार | ४० | ४०.०० |
| २ | १० ते २० हजार | २५ | २५.०० |
| ३ | २० ते ३० हजार | २० | २०.०० |
| ४ | ३० ते ४० हजार | १० | १०.०० |
| ५ | ४० हजाराच्या वर | ०५ | ०५.०० |
| | एकूण | १०० | १००.०० |

वरिल सारणीवरुन असे दिसुन येते की, १०० उत्तरदात्यांपैकी १ ते १० हजार उत्पन्न असलेल्या शेतकऱ्यांचे प्रमाण ४०.०० टक्के, आहे. व १० ते २० हजार उत्पन्न असणारे २५.०० टक्के उत्तरदाते आहेत, २० ते ३० हजार उत्पन्न असणारे २०.०० टक्के, तर ३० ते ४० हजार उत्पन्न असणारे १०.०० टक्के, व ४० हजाराच्या वर उत्पन्न असणारे ०५.०० टक्के उत्तरदाते आहेत.

### सारणी क्र -४ शेतीसाठी सुधारित अवजारांचा व पारंपारिक अवजारांचा उपयोग दर्शविणारी सारणी

| अ.क्र | विवरण | वारंवारिता | टक्केवारि |
|---|---|---|---|
| १ | सुधारित | १८ | १८.०० |
| २ | पारंपारिक | ८२ | ८२.०० |
| | एकूण | १०० | १००.०० |

वरिल सारणीवरुन असे दिसुन येते की, नागपूर क्षेत्रात सुधारित अवजारांचा उपयोग करणारे १८.०० टक्के उत्तरदाते आहेत व पारंपारिक अवजारांचा उपयोग करणारे ८२.०० टक्के उत्तरदाते आहेत.

सारणी क्र – ५ संत्रा लागवड करतांना शास्त्रशुध्द पध्दतींचा उपयोग दर्शविणारी सारणी

| अ.क्र | विवरण | वारंवारिता | टक्केवारि |
|---|---|---|---|
| १ | होय | ७६ | ७६.०० |
| २ | नाही | २४ | २४.०० |
| | एकूण | १०० | १००.०० |

वरिल सारणीवरुन असे दिसुन येते की, नागपूर क्षेत्रात संत्रा लागवड करतांना शास्त्रशुध्द पध्दतींचा उपयोग करणारे ७६.०० टक्के उत्तरदाते आहेत व शास्त्रशुध्द पध्दतींचा उपयोग न करणारे २४.०० टक्के उत्तरदाते आहेत.

सारणी क्र – ६ संत्रा बाजारपेठेबद्दल शेतकऱ्यांना पुरेशी माहिती दर्शविणारी सारणी

| अ.क्र | विवरण | वारंवारिता | टक्केवारि |
|---|---|---|---|
| १ | होय | ८१ | ८१.०० |
| २ | नाही | १९ | १९.०० |
| | एकूण | १०० | १००.०० |

वरिल सारणीवरुन असे दिसुन येते की, संत्रा बाजारपठेबद्दल शेतकऱ्यांना पुरेशी माहिती असणारे ८१.०० टक्के उत्तरदाते आहेत व पुरेशी माहिती नसणारे २४.०० टक्के उत्तरदाते आहेत.

सारणी क्र – ७ निसर्गाच्या अनियमितपणाचा संत्रा उत्पादनावर होणारा परिणाम दर्शविणारी सारणी

| अ.क्र | विवरण | वारंवारिता | टक्केवारि |
|---|---|---|---|
| १ | थोडाफार | १४ | १४.०० |
| २ | अधिक जास्त | ६५ | ६५.०० |
| ३ | काहीही नाही | २१ | २१.०० |
| | एकूण | १०० | १००.०० |

वरिल सारणीवरुन असे दिसुन येते की, निसर्गाच्या अनियमितपणाचा संत्रा उत्पादनावर थोडाफार परिणाम पडणारे १४.०० टक्के उत्तरदाते आहेत व अधिक जास्त परिणाम पडणारे ६५.०० टक्के उत्तरदाते आहेत व काहीही नाही परिणाम पडणारे २१.०० टक्के उत्तरदाते आहेत.

सारणी क्र – ८ शासनाच्या विविध योजनांबद्दल माहीती दर्शविणारी सारणी

| अ.क्र | विवरण | वारंवारिता | टक्केवारि |
|---|---|---|---|
| १ | काही प्रमाणात | २२ | २२.०० |
| २ | अजिबात नाही | ३४ | ३४.०० |
| ३ | संपूर्ण | ४४ | ४४.०० |
| | एकूण | १०० | १००.०० |

वरिल सारणीवरुन असे दिसुन येते की, शासनाच्या विविध योजनांबद्दल काही प्रमाणात माहीती असणारे २२.०० टक्के उत्तरदाते आहेत व अजिबात नाही माहीती असणारे ३४.०० टक्के उत्तरदाते आहेत व संपूर्ण माहीती असणारे ४४.०० टक्के उत्तरदाते आहेत.

सारणी क्र – ९ संत्रा लागवड करतांना आर्थिक अडचणींना तोंड देणारी सारणी

| अ.क्र | विवरण | वारंवारिता | टक्केवारि |
|---|---|---|---|
| १ | होय | ३२ | ३२.०० |
| २ | नाही | ६८ | ६८.०० |
| | एकूण | १०० | १००.०० |

वरिल सारणीवरून असे दिसुन येते की, नागपूर क्षेत्रात संत्रा लागवड करतांना आर्थिक अडचणींना तोंड देणारे ३२.०० टक्के उत्तरदाते आहेत व तोंड न देणारे ६८.०० टक्के उत्तरदाते आहेत.

**निष्कर्ष:–**

१. संत्रा झाडाची लागवड शास्त्रशुध्द पध्दतीने केली जात नाही.
२. निसर्गाचा अनियमितपणा, अयोग्य व्यवस्थापण, आधुनिक तंत्रज्ञान नसल्यामुळे शेतकऱ्यांचे खुप नुकसान होते
३. शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती फार हालाखिची आहे.
४. संत्रा निर्यातीमध्ये पाहिजे त्या प्रमाणात वाढ झालेली नाही.
५. लागवडीसाठी सुधारित अवजारांचा उपयोग न करता पारंपारिक अवजारांचा उपयोग केला जातो.

**उपाययोजना :–**

१. संत्रा हे आरोग्य वर्धक फळ आहे. आरोग्याच्या दृष्टीने त्याचे महत्व लक्षात घेता संत्र्यावर प्रक्रिया करणारे उद्योग या भागात स्थापन करावेत.
२. संत्रा साठवणूकीच्या सोयी षासनाने ठिकठिकाणी उपलब्ध करून द्यावेत.
३. शेतकऱ्यांनी संत्रा बागेला पाणी देण्यासाठी ठिंबक सिंचनाचा वापर करावा.
४. शेतकऱ्यांना आधुनिक उत्पादन पध्दतीने प्रशिक्षण देऊन त्यानुसार उत्पादन पध्दतीचा अवलंब करण्यासाठी अर्थसाहाय्य द्यावे.

**संदर्भग्रंथ सूची**

१. कृषि मार्गदर्शिका व संत्रा वर्गिय पुस्तिका: पंजाबराव कृषि विद्यापीठ, अकोला २००५
२. नागपूर नागपूर संत्र्याची निर्यात
३. संशोधन पध्दती : प्रा. डॅा. सुधीर बोधनकर, प्रा. अलोणी
४. कृषीभूगोल प्रशांत पब्लिकेशन, जळगाव प्रथम आवृत्ती २००८
५. कृषि मार्गदर्शिका व दैनंदिनी: पंजाबराव कृषि विद्यापीठ,अकोला आवृत्ती २००८
६. संत्रा लागवड, प्रक्रिया उद्योग गोडवा कृषि प्रकाशन, पुणे
७. संत्रा उत्पादन गोदावरी पब्लिकेशन, नाशिक
८. जिल्हा कृषि अधिक्षक कार्यालय, नागपूर